VOL. 4 | ISSUE 2 | FEB. 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES


A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**
On the Occasion of One Day International Conference On

## RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17th February, 2018

(BOOK- 1)



*Guest Editors*
**Prof. G. N. Sonwane**
**Dr. Shirish Kadu**

ORGANIZED BY
MGEWS
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES,
KALYAN, DIST. THANE &
NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF
MULTI-DISCIPLINARY STUDIES, PARBHANI

| | | |
|---|---|---|
| 40. मानवी जीवनाच्या जडण–घडणीमध्ये संगीत एक प्रभावी माध्यम | प्रा. कु.प्रिती बी. इंगळे (वाकपांजर) | 122 |
| 41. भारतीय फिल्म संगीत पर जैज़ का प्रभाव | रूचि गुरू | 126 |
| 42. तबला नवाज़ उ0 शेख दाउद की वादन शैली ... | हिमांशु जोशी | 128 |
| 43. संगीत शिक्षा द्वारा आध्यात्मिक लक्ष्यों की प्राप्ति | ज्योति उपाध्याय | 130 |
| 44. संगीत में ध्यान और रूचि की महत्व | डॉ0 महेश चन्द्र पाण्डे | 132 |
| 45. संगीत घरानो एवं शिक्षण संस्थाओं के माध्यम से संगीत शिक्षा | मुकेश कुमार | 134 |
| 46. उत्तराखंड के कुमाऊँनी लोक संगीत में नृत्यों गीतों की भूमिका | डॉ0 पूर्णा बिष्ट | 136 |
| 47. संगीत की आध्यात्मिक शक्ति | सीमा करगेती | 139 |
| 48. मानवाधिकार: मानवी जिवनातील मुलभूत अधिकार | आकाश शेषराव बांगर | 141 |
| 49. भारतीय शिल्प कलेतील भैरव मूर्तिशिल्प | डॉ . भेलोंडे जगदिश व्यंकटराव | 145 |
| 50. भारतीय लोकशाही सिध्दान्तन आणि व्यवहार | प्रा. मदन जहॉगीर पाडवी | 147 |
| 51. समलैंगिकता आणि पर्यायी मातृत्व ... | प्रा.डॉ.बी.आर.भोसले | 152 |
| 52. डिजिटल ग्रंथालय : काळाची गरज | डॉ. ह.सो. बिडवे | 156 |
| 53. नरहर कुरुंदकरांचे दलित विषयक विचार : एक ऐतिहासिक विश्लेषण | प्रा.डॉ. बाळासाहेब क्षिरसागर | 159 |
| 54. चिकित्सा के क्षेत्र में सांगितिक अवदान | डॉ० राहुल कुमार | 161 |
| 55. डिफ्युजर सिंचन पध्दती–फळबागांसाठी प्रभावी माध्यम | डॉ. जयश्री सदाशिव चव्हाण | 164 |
| 56. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संघटनाविषयक विचार | गायकवाड प्रतिमा बाळासाहेब | |
| | डॉ. वाकळे मानितकुमार अ. | 168 |
| 57. भारतातील कर उत्पानातील प्रवाह | डॉ. हासिम वलांडकर | 173 |
| 58. **भारतीय पर्यटनातील इतिहासाची भुमिका : एक अभ्यास** | **डॉ.कोल्हेकर डी.डी.** | 177 |
| 59. भारत आणि चीनच्या सैन्यषक्तीचे तौलनिक अध्ययन | प्रा. जी. एन. सोनवणे | 180 |
| 60. नैतिक निर्णय : व्यक्तिनिष्ठवादी व्याख्या | डॉ. सुमेरू गोंडाणे | 184 |
| 61. व्यवस्थापनामध्ये मनोरेखनाचे महत्व | डॉ. पवार जी. आर. | 187 |
| 62. ग्रामीण समाजषास्त्र | प्रा.तांदळे सुरेंद्र सुंदरराव | 190 |
| 63. स्वातंत्र्यपूर्व काळातील महिला सबलीकरण – एक अभ्यास | प्रा.हुरगूळे एन आर | 192 |
| 64. भारतीय संस्कृतीमधील बौध्द धम्माचे योगदान. | डॉ. डी. ए. पाईकराव, | 195 |
| 65. **मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र** | जयदेव उध्दवराव मोहिते | 199 |
| 66. जगतिकीकरणाची भारतीय महिलांच्या विकासातील भूमिका | डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | 204 |
| 67. भारतरत्न इंदिरा गांधी : एक **शक्तिस्थळ** | डॉ.धायगुडे ज्योती सुभाषराव | 208 |
| 68. महाराष्ट्र प्रशासनातील मानवसंसाधन विकास व..... | ज्योती महिशंकर फुलारी | 212 |
| 69. भारतीय स्वातंत्र्य लढातील भारतीय मुस्लीमांचे योगदान | डॉ.खासेराव हि. बहिरव शिंदे–पाटील | 215 |
| 70. लोकप्रशासनाचा अर्थ, व्याप्ती, स्वरुप आणि महत्व | हांगे सुधाकर एस. | 217 |
| 71. लोक संगीत– एक अथांग सूरसागर | डॉ. सरिता इंगळे | 219 |
| 72. 16 ते 21 वयोगटातील ओ.बी.सी. मुलींच्या **शैक्षणीक** गळतीचा अभ्यास | प्रा. माने उषा यशवंतराव | 222 |
| 73. लिंग विषमता –तृतीयपंथीयाच्या विशेष संदर्भात..... | डॉ. प्रतिभा अहिरे | 228 |
| 74. मीरा की भक्ती में संगीत | प्रा. मिनाक्षी बसवंत | 231 |
| 75. पारशी धर्माचे मानवतावादी तत्त्वज्ञान: एक दृष्टिक्षेप | श्री नरवाडे बालाजी मारोतराव | 233 |
| 76. संत साहित्य व संगीत | प्रा. नेत्रा मानकर (सोलव) | 236 |
| 77. निकोप लोकशाहीसाठी | प्रा. किर्तीकर वाल्मीक भीमराव | 238 |
| 78. आधुनिकीकरण में भारतीय वाद्यों का विकसित रूप | सोनाली ब. आसरकर | 241 |
| 79. सद्यपरिस्थिती नुसार शास्त्रीय संगीत में उपलब्धियाँ | डॉ. नेत्रा श्रीकांत तेल्हारकर | 243 |
| 80. भारताचे स्वच्छता धोरण | प्रा. प्रणया महेंद्र पाटील | 246 |


Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

66

# जगतिकीकरणाची भारतीय महिलांच्या विकासातील भूमिका

**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी
मो. 8983776077

आज सर्वत्र जागतिकीकरणाचे परिणाम जाणवत आहेत. कारण, राजकारण, समाजकारण, शिक्षण, संस्कृती, समाज, पर्यावरण, या यासारख्या अनेक घटकांवर जागतिकीकरणाचा प्रभाव आपण अनुभवतो आहेत. विकासासही जागतिकरकरण मोठया प्रमाणात जबाबदार आहे. फ्रेंच राज्यक्रांतीने मानवावर समता, स्वातंत्र्य, विश्वबंधू या मुल्यांचा संस्कार केला, औद्योगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणात मानवी जीवनात भौतिक प्रगती झाली, इंग्लंडच्या क्रांती व अमेरिकन क्रांतिने मानवी जीवनाच्या इतिहासाची संकल्पना बदलून टाकली. त्यांनी हे जग दोन भागात, दोनी क्रांति वर्गात विभागून यांच्यातील वर्ग संघर्षाचा इतिहास हे नविन प्रतिमान पुढे आले. याचाच इतिहास भांडवलशाही व साम्यवाद यांच्यातील संघर्ष असा मांडला जातो, आणि या दोन्हीच्या संघर्षातून 21 व्या शतकात जगाची नाळ व्यापारवादाच्या अंगाने एका नविन संकल्पनेशी जोडली ती संकल्पना म्हणजे **जागतिकीकरण** होय. जागतिकीकरण म्हणजे 'जागतिक पातळीवर राजकारण, समाजकारण, अर्थकारण, संस्कृतिकरण यांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया होय.' पण जागतिकरणाचा विचार आपण विशेषतः आर्थिक पातळीवर जास्त करतो, अर्थव्यवस्था उद्योग, व्यापार क्षेत्राचा आपण जागतिकीकरणाशी संबध जोडण्याचा प्रयत्न करतो.

**शोध निबंधाचा उद्येश :-**

- जगतिकीकरण संकल्पना जाणुन घेणे.
- जगतिकीकरणाचा स्त्रियांच्या जीवनावरील प्रभाव अभ्यासणे.
- जगतिकीकरणामुळे स्त्रियांचा बदलता सामाजिक, राजकीय, आर्थिक शैक्षणिक दर्जा अभ्यासणे.
- जगतिकीरणाचा विविध सामाजिक संस्थावरील परिणाम जाणुन घेणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित असून विषयाची मांडणी करण्यासाठी संदर्भग्रंथे, पुस्तके, मासीके, इंटरनेट, वृतपत्रांचा आधार घेतलेला आहे.

**गृहितके :-**

जागतिकीकरणाचे भारतिय महिलांवर मुलगामी परिणाम झाले आहेत. महिला विकासात जागतिकीकरणाचा फार मोठा वाटा आहे. या गृहितकांना अनुसरून विचारांची मांडणी केली आहे.

**जागतिकीकरणाचा अर्थ :-**

जागतिकीकरण प्रक्रिया जगातिल सर्व देशात सुरू आहे. ती एक बहुआयामी प्रक्रिया असून मुलतः ही प्रक्रिया आर्थिकक्षेत्राशी व त्यातील परिवर्तनाशी संबधीत असली तरीही या प्रक्रियेमुळे संपूर्ण समाज जीवन ढवळून निघाले आहे. 1970 च्या दशात प्रारंभ झालेल्या प्रक्रियेने अत्यंत व्यापक स्वरूप धारण केले आहे. भारतात 1991 पासून जागतिकीकरणास प्रारंभ झाला. तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग, पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी नविन आर्थिक धोरण म्हणून जागतिकीकरणाचा स्विकार केला. जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्था खुल्या झाल्या. एकुणच स्थानिक बाजारपेठेतील वस्तु आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचल्या.जागतिकीकरणामुळे प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत अमुलाग्र बदल घडुन आले. विश्वस्तरावर उद्योगांना लागणारे भांडवल व वित्तपुरवठा, आर्थिक बाजार व कर्ज घेऊ इच्छिनारांना फार मोठ्या प्रमाणावर भांडवल उपलब्ध झाले, त्यामुळे अनेक देशांना आपल्या वस्तु व सेवा इतर देशांना पुरवता येऊ लागल्या वस्तू व सेवांची देवाणघेवाण सोईची झाली. सुशिक्षीत बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या व नोकरीच्या संधी मिळाल्याने या सर्वांचा परिणाम असा झाला की जागतिक पातळीवर सर्वच क्षेत्रामध्ये स्पर्धा निर्माण झाली व ती वाढीस लागली आणि उत्पादनाचा दर्जा सुधारू लागला, त्यामुळेच विवीध देशातील लोकांचे एकुण राहीणीमान, त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरा त्यांची संस्कृती आणि सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू झाली. आतंरराष्ट्रीय पातळीवर पर्यटन उद्योगास चालना मिळाली त्यामुळे जागतिकीकरणाने कोणतेही क्षेत्र सोडलेले नाही. त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रावर दिसून

येतो. जागतिकीकरणामुळे मानवी जीवनाला गती मिळाली, माणसाचे जीवन गतिमान झाले आणि संपूर्ण जग हे एक वैश्विक खेडे म्हणून ओळखले जाऊ लागले. जागतिकीकरणामुळे जागतिक विकसीत राष्ट्रांनी उदारीकरण, खाजगीकरण व भांडवलवादी अर्थव्यवस्थेचा स्विकार केल्यामुळे जागतिक संस्कृती निर्माण होत आहे. मनोरंजन, क्रिडा, साहित्य, कला, वेशभुषा, खानपान, संदेशवहन या सारख्या घटकांचे जागतिकीकरण घडत असल्यामुळे संस्कृती परिवर्तन मोठ्या प्रमाणात होत आहे. भौतीक बाबींवर जास्त आघात होत असला तरीही जागतिकीकरणातून प्रथा, परंपरा, संकेत, विश्वास इ. घटकांवरही कमी अधिक परिणाम होत आहे. संगणक, इंटरनेट, ई–मेल इ. साधनामुळे माहिती तंत्रज्ञानाचे जलदगतीने हस्तांतरण होत आहे परिणामी भारतिय सामाजिक जीवन प्रणालीवर मुलगामी परिणाम होत असल्याचे दिसून येते.

**जागतिक महिला :–**

महिलांच्या बाबतीत जागतिकीकरण ही दोन बाजू असणारी प्रकिया मानली जाते. एका बाजुला जागतिकीकरणामुळे महिलांना चांगल्या शिक्षणाच्या संधी व जागतिक पातळीवर आपली छाप उतरविण्याचे मार्ग उपलब्ध झाले आहेत, तर दुसऱ्या बाजुला जागतिकीकरणामुळे भारतीय महिलांबरोबर इतर विकसनशील देशातील महिला सामाजिक सुरक्षीततेचे कायदे, अंशदान रूपी संरक्षण श्रमाचे हक्क व इतर सुरक्षा उपायांपासून वंचित होतांना दिसते. जागतिकीकरणाचे जागतिक अर्थव्यवस्थेवर चांगले परिणाम वाढवून वाईट परिणामांची तिव्रता कमी करावयाची झाल्यास सर्व समावेशक विकासावर आधारित महिलांनाही जागतिकीकरणामुळे गतिमान झालेल्या विकासाच्या प्रकियेत सामावुन घेणे, त्यांचा बदलाचे एजंट म्हणून विचार करणे व विकासाचे काम त्यांच्या पर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

आज जगभरात महत्वपूर्ण पदावर महिला लक्षणीय प्रमाणात विराजमान झालेल्या दिसून येतात, भारतीय वंशाच्या स्त्रियांचा ही त्यात समावेश होतांना दिसतो. मग त्या पेप्सीको कंपनीच्या इद्रानुची असतील वा नो मुरा होल्डिंगच्या सोनल वर्मा असतील. जर्मनीच्या पंतप्रधान अंजला मर्केल यांच्या कर्तत्वाच्या जोरावर आणि त्यांच्या धोरणामुळे जर्मनी अर्थव्यवस्था मजबुत बनली. सध्या जगभरात स्त्रियांचे विविध क्षेत्रातील अस्तित्व ठळकपणे जाणवते आहे. जसे की समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, पर्यावरण, पर्यटन, कला, अभीनय, साहित्य, सैन्यदल, विविध शोध, संशोधन या सारख्या विविध क्षेत्रात जगतील महिलांनी आपला ठसा उमटवला आहे. चीनमध्ये वरिष्ट व्यवस्थापक पदावर 32 टक्के महिला आहेत तर अमेरिकेत 23 टक्के महिला प्रमुख पदावर कार्यरत आहेत. शिक्षणाच्या मदतीने स्त्रियांनी घेतलेली ही भरारी आणि आघाडी लक्षणीय आहे फोर्बसच्या श्रीमंत व्यक्तिच्या यादीत आज 14 स्त्रियांचा समावेश झाला आहे.

**भारतीय महिला :–**

भारतीय महिलांच्या संदर्भात भुतकाळांचा विचार करता भारतीय महिला विविध प्रकारच्या समस्यांनी ग्रासलेल्या होत्या त्याचे मुख्यकाराण, अज्ञान, निरक्षरता, अंधश्रध्दा, स्वतःला दुर्बल समजने, अधिकाराची जाणीव नसने, कायद्या विषयी अनभीज्ञता या सारखी अनेक कारणे सांगता येतील. ज्यांनी स्त्रियांना बंदीस्त केले प्रथा, परंपरा, संस्कृतीच्या नावाखाली त्यांची गळचेपी केली. त्यांना विविध प्रकारच्या हक्क अधिकारांपासुन वंचीत ठेवले आणि चार भिंतीत बंदिस्त केले. स्त्रियांवर कौटूंबीक जबाबदाऱ्या त्यांच्या विकासातील मोठ्या अडथळा आहेत. कुटूंबातील घरकाम, मुले, आजारी व्यक्ती, जेष्ठ व्यक्तिंची सर्वस्वी जबाबदारी स्त्रियांची मानली जाते. विवाहीत स्त्रियांना घर, उद्योग, व्यवसाय, नोकरी यांच्यात समतोल साधावा लागतो. पितृसत्ताक कुटूंबव्यवस्था, सामाजिक बंधने, जात, धर्म, वर्ग, वंशावर आधारीत भेदभावाचे धोरण, उत्पादन संसाधनांची अपुरी उपलब्धता, दारिद्र्य, प्रगतीसाठी दिल्या जाणाऱ्या अपुऱ्या सवलती, संधी, कुपोषणामुळे ताकदीचा अभाव पारंपरिक विचारसरणी, अंधश्रध्दा, स्वतःला बंदीस्त करून घेणे या सारख्या विवीध कारणांमुळे आजही अनेक ठिकाणी महिलांना जुन्या, परंपरा व विचारसरणीला सामोरे जावे लागत आहे. महिलांना घराबाहेर पडण्यास निर्बंध आहेत. जागतिकीकरणामुळे एक नविन परिस्थिती निर्माण होऊन सर्व अडचणींवर मात करून महिला स्वतःला सिध्द करत आहेत.

**जगतिकीकरणामुळे महिलांसमोर नविन आव्हाने व संधी निर्माण होत आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.**

**महिलांसमोरिल आव्हाने :–**

भारतीय बहुसंख्य लोक हे ग्रामिण भागात राहातात. भारतातील खेड्यांची संख्या आजही पाच लाखा पेक्षा अधिक आहे. आणि बहुसंख्य लोक शेती व्यवसाय करतात. भारतीय महिला शेती, पशुपालन, ग्रामोद्योगात कार्यरत आहेत. यांत्रीकीकरण व स्वयंचलीत प्रकिया यांचा वाढता कल व वापरामुळे महिलांना उपलब्ध होणारे काम कमी कमी होत आहे.

- ❖ मुक्त अर्थव्यवस्थेत व्यवसायाच्या ठिकाणी लिंगावर आधारित विभाजन वाढीस लागून महिलांसाठी कामाच्या ठिकाणाची परिस्थिती

वरचेवर किचकट बनत आहे. परिणामी हलक्या दर्जाची व अल्पवेतनाची रोजगार संधी महिलांच्या वाट्याला येत आहे.

- ❖ वाढत्या स्थलांतरामुळे, शहराच्या आकर्षनामुळे, रोजगार प्राप्तीसाठी पुरूष शहरात स्थलांतरीत होत आहेत. परिणामी महिलांना कौटूंबिक कामे, शेतातील कामे, ग्रामीण भागातील रोजगार अशा विविध जबाबदाऱ्या पेलाव्या लागत आहेत.
- ❖ नवननविन तंत्रज्ञानाची माहिती, तांत्रीक कौशल्य व तांत्रीक शिक्षण या तीनही गोष्टी महिला उद्योजकांसाठी पोषक आहेत. शिक्षण व प्रशिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षणाचा खर्च वाढतो आहे. याचा परिणाम कौटूंबीक बजेटवर पडुन मुलीच्या शिक्षणाचा बळी मुलाच्या शिक्षणासाठी दिला जात आहे.
- ❖ खाजगीकरणाचे धोरण व सार्वजनिक सेवांमधील घट यामुळे महिलांसाठीच्या नियीमत रोजगाराच्या संधी मध्ये घट होत आहे.
- ❖ जगतिकीकरणाच्या वातावरणामध्ये सामाजिक व वित्तीय सुरक्षासाधने नाहीशी होत आहेत. त्यामुळे दारिद्रय उच्चाटन कार्यालय, शिक्षणाचे सार्वत्रीकरण व महिलांना उपयोगी आरोग्य कार्यक्रमावर विपरित परिणाम होत आहे.

जगतिकीकरणाच्या प्रक्रियेत महिलांचे मोठ्या प्रमाणात सिमांतीकरण होण्याची शक्यता यासर्व बाबीवरून म्हणता येते की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षण व प्रशिक्षणाच्या अभावामुळे महिलांसाठी रोजगाराच्या संधी कमी होणे, वेतन कमी होणे, रोजगार हामी नष्ट होणे, यामुळे आधुनिक प्रक्रियेतुन महिला बाहेर फेकल्या जातील अशी शंका निर्माण होत आहे.

जागतिकीकरणामुळे **महिलांना प्राप्त होणाऱ्या संधी :–**

जागतिकीकरण प्रक्रियेत घडुन येणारे काही बदल स्वातंत्रताहं आहेत. कारण त्या बदलामुळे भारतिय महिला या विकास प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहेत. जागतिकीकरणामुळे महिलांसमोर जशी आव्हाणे निर्माण होणार आहेत तसेच त्यांना विकासाच्या संधी निर्माण होत आहेत. त्या संधी पुढील प्रमाणे सांगता येतील.

- ❖ उच्च व दर्जेदार शिक्षणाच्या संधी जागतिकीकरणामुळे उपलब्ध होत आहेत. कारण की आज. जागतिकीकरणामुळे ई विद्यापीठे, स्वातंत्र विद्यापीठे तसेच जगातील शिक्षणसंस्थाची ओळख होत आहे.
- ❖ आधुनिक क्षेत्रे, तांत्रीकक्षेत्रात पात्र महिलांना विकासाच्या संधी उपलब्ध होत आहेत. यामुळे महिलांना देशातच नाहीतर जगात स्वतःची ओळख निर्माण करणे सहज शक्य होइल.
- ❖ शिक्षणामुळे समाजाचा वैचारिक दृष्टीकोन निर्माण होऊन स्त्रियांच्या कौटूंबीक भुमीकांमध्ये बदल होत आहे.
- ❖ जागतिकीकरणामुळे प्रामुख्याने शहरीभागात महिलांना मोठ्या प्रमाणात समानतेची वागणूक मीळत आहे. लिंगावर आधारित विषमता कमी झाल्यामुळे सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणीक विषमता कमी झाल्यामुळे सामाजिक, आर्थिकदृष्टीने महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होत आहे.

जागतिकीकरणाचे **महिलांच्या जिवनावर झालेले परिणामः–**

- ❖ जागतिकीकरणापूर्वी पुरूष कामधंदा, नोकरी, व्यवसाय करत असे व महिला केवळ घर सांभाळण्याचे काम करत असत. जागतिकीकरणाने घरचालवणे व घरसांभाळणे या कामात पुरूषां बरोबरच महिलांचाही सहभाग वाढवला. स्वयंपाकाची नवनविन साधने व यंत्रामुळे महिलांना पुरूषही स्वंयपाकात मदत करत आहेत. महिला लहान मोठे व्यवसाय, उद्योग, नोकरी करून अनेक महिला कुटूंबाला आर्थिक हातभार लावत आहेत. व्यवसाय, उद्योगासाठी घराबाहेर पडुन आपली नविन ओळख निर्माण करीत आहेत.
- ❖ जागतिकीकरणामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमे, दुरदर्शन, विविध चॅनल्स, विविध प्रसारमाध्यमांमुळे विविध देशातील सण, उत्सव, समारंभ, परंपरा, आधोरेखित केल्यात त्यातून महिलांना जीवन जगण्याची दिशा मिळाली व त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. अनेक देशांमध्ये सांस्कृतीक देवाण–घेवाण सुरू झाली. विविध खाजगी वाहीन्यांवरील सिरियल्स व विविध विषयावरील प्रसारीत होणाऱ्या कार्यक्रमांमधुन लेखीका, कवियत्री, महिला पत्रकार, अभिनेत्री, उद्योजिका, राजकारणी, चित्रपट निर्मात्या, प्रशासकीय अधिकारी, नृत्यांगना, चित्रकार, डॉक्टर्स, इंजिनीयर्स, संरक्षण क्षेत्रातील अधिकारी, शिक्षणक्षेत्रातील महिला संपुर्ण जगासमोर आपली बाजु मांडत आहेत. महिलांनी आपले स्वतंत्र आस्तित्व निर्माण तर केलेच, त्या बरोबरच देशी व विदेशी भाषा आवगत करून परस्परांशी संवाद करत आहेत, स्वबळावर स्वतंत्रपणे निणर्य घेत आहेत.
- ❖ जागतिकीकरणामुळे जी क्षेत्रे केवळ पुरूषांच्या मक्तेदारीची होती त्या क्षेत्रातही महिलांनी प्रवेश मिळवला आहे. यासाठी महिलांना प्रोत्साहन

देणाऱ्या योजना, सवलती, आरक्षण, संधीमुळे शासनाच्या या धोरणांचा फायदा सर्वसामान्य महिलांना सहज घेत आहेत.

- ❖ सौंदर्यस्पर्धा, फॅशन इंडस्ट्री, चित्रपट उद्योग, जाहिरात उद्योग अशा विविध ठिकाणी सौंदर्यवती महिलांना जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिध्दी व पैसा प्राप्त करता येतो.
- ❖ जागतिकीकरणाच्या परिणामुळे ग्रामीण शहरी भागात माहिती तंत्रज्ञानाचे जाळे पसरवण्यास मदत झाल्यामुळे स्त्रियांच्या वापरात मोबाइल, इंटरनेट आले असून स्त्रिया सफाईदारपणे त्याचा वापर करत आहे.

**सारांश :**

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे स्त्रियांमध्ये अधिकार व कर्तव्यात जागृती आली आहे. जागतिकीकरणामुळे स्त्रियांना नवनविन विकासाच्या संधी सर्वच क्षेत्रात उपलब्ध होत आहेत या संधीच्या उपयोगासाठी महिलां मधिल क्षमतांचा विकास होणे आवश्यक आहे. प्रत्येक ठिकाणी धाडसाने, कल्पकतेने मार्गक्रमण करणारी महिलांही समाजाचे भुषण आहे. महिलांसमोरील विविध अडथळे जाणुन घेवुन त्यांचे निराकरण करण्याचे काम ज्या प्रमाणे महिला करत आहेत. तसेच समाजातील प्रत्येक घटकाने करणे गरजेचे आहे तरच समाजातील अर्धीशक्ती ही स्वविकास व समाजविकासासाठी मोलाचे कार्य करू शकेल.

**संदर्भसूची :–**


1. प्राचार्य देसाई, मुख्यसंपादक, महिला सबलीकरण, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव, मार्च 2014 पान नं. 27 ते 32.
2. कसवे रावसाहेब. जागतिकीकरणाचे स्वरूप व भवितव्य, सुमेध प्रकाशन, पुणे 2010 पृ.क. 22.
3. Dr. Gore. Chief editor, Recent Trends in family and marrage institutions. Jyotichandra Pub., Latur. Dec 2014 P.N. 108, 109.
4. डॉ. गायकवाड, संपादक, मुख्य सामाजिक संस्था व समस्या, अरूणा प्रकाशन, लातुर, 2014, पृ.क. 10.
5. परिवर्तनाचे वाटसरू, डिसेंबर 2013 पृ.क. 29.
6. उद्योजक, अक्टोबर 2013, पृ.क. 32.
7. उद्योजक मासीक, जानेवारी 2000.
8. www.wikipiedia.org
9. social welfare, monthly, Aug 2013.


□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani